# पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

डॉ. शाकेरा इनामदार
एम्.एस्सी.,पीएच्.डी.
कार्यक्रम समन्वयक

कार्यालय क्र. : ०२०-२५६९७३४१
०२०-२५६०११५३
०२०-२५६०११६०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३४१
मोबाईल : ९८२२ ७० ७० ६१


संदर्भ : रासेयो /६३०/१३

दि.०४/०३/२०१३

प्रती,
मा. प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना संलग्नीत महाविद्यालये
पुणे शहर, पुणे

**विषय : स्वयंसिध्दा अभियान अंतर्गत युवतींना स्वसंरक्षण प्रशिक्षण देणे बाबत...**

**महोदय,**

पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना, पुणे, पुणे शहर पोलीस आयुक्तालय व स्वयंसिध्दा असोसिएशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबीर पूर्व निवड चाचणी शिबीराचे आयोजन दि. ०५/०३/२०१३ रोजी स. ८.०० वा. पोलीस मुख्यालय, शिवाजी नगर, पुणे ५ येथे करण्यात आले आहे. पुणे शहरातील प्रत्येक महाविद्यालयातील २ विद्यार्थिनींना प्रशिक्षण देवून त्यांच्या मार्फत इतर विद्यार्थीनींना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सदर विद्यार्थिंना त्यांच्या बायोडाटासह पाठवावे.

सदर निवड चाचणी शिबीरातून निवड झालेल्या विद्यार्थिनींकरीता मार्च २०१३ या महिन्यामध्ये ५ दिवसीय मास्टर ट्रेनींग शिबीराचे आयोजन करण्यात येणार आहे. त्या शिबीराकरीता निवड झालेल्या विद्यार्थिनींनी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

पुढील शिबीराची तारीख आपणास व विद्यार्थीनींना एसएमएस द्वारे कळविण्यात येईल. तरी या पूर्व निवडचाचणी शिबीराकरीता आपल्या महाविद्यालयातील दोन विद्यार्थिनी वरील प्रमाणे पाठविण्यात यावे, ही विनंती,

***सोबत विद्यार्थिंनी नियमावली जोडली आहे.***

कळावे,

आपली विश्वासू,

कार्यक्रम समन्वयक,
राष्ट्रीय सेवा योजना

Pc2/Tin Job/Daily Lette134

खालील बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | वय | – १८–२५ वर्षे |
| २. | उंची | – ५.५ फूट (१५२ से.मी. पेक्षा जास्त) |
| ३. | लिंग | – विद्यार्थिंनी व महिला प्राध्यापकांसाठी |
| ४. | आरोग्य | – शारिरीक दृष्ट्या सक्षम |
| ५. | स्वंयसिध्दा | – स्वयंसिध्दा कोर्स धारक – महाराष्ट्र शासन आयोजित |
| ६. | मार्शल आर्ट प्राविण्य | – ब्लॅक बेल्ट धारक – महाराष्ट्र शासन मान्य खेळात |
| ७. | मार्शल आर्ट खेळ प्राविण्य | – राज्यस्तर प्राविण्य, महाराष्ट्र शासन आयोजित |
| ८. | इतर खेळ प्राविण्य | – राष्ट्रीय खेळ पदक विजेती |
| ९. | प्रशिक्षण अनुभव | – कमीत कमी २ वर्षाचा स्वसंरक्षण प्रशिक्षण अनुभवी महिला |
| १०. | महिला पोलीस | – महिला पोलीस पात्र नियुक्ती झालेली असावी |

(टिप – १ ते ५ आवश्यक पात्रता बाबी, ६ ते १० कुठलाही एक ग्राह्य धरला जाईल.)